# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: २१००१:२०१८) (ISO/IES: २७००१-२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१०० / १५३ / १७०

email: secretary@msbte.com web: www.msbte.ac.in


जा.क्र.मरातंशिमं/का-५२/व्दिभाषिक/२०२५/ 3828 दिनांक: 24 JUL 2025

## महत्वाचे परिपत्रक

प्रति,
प्राचार्य, मंडळाशी संलग्नित अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम
राबविणा-या संस्था

विषय: अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांतील (K-Scheme) प्रथम व तृतीय सत्रातील विषयांचे Lab Manuals तसेच मराठी-इंग्रजी (व्दिभाषिक) भाषेमधील शैक्षणिक साधन सामग्रीच्या उपलब्धतेबाबत.

संदर्भ: मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५१/मराठी भाषा/२०२२/३२५९ दि. ६/६/२०२३

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाव्दारे मंडळाने मराठी- इंग्रजी (व्दिभाषिक) पर्याय निवडणा-या मंडळाशी सलंग्नित अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रथम ते तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांकरिता अध्यापनाची प्रक्रिया मराठी - इंग्रजी (व्दिभाषिक) भाषेमध्ये राबविण्याबाबतची कार्यवाही प्रभाविपणे करणे व त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता निर्देशित केले आहे.

त्याअनुषंगाने मंडळाने अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील प्रथम व तृतीय सत्रातील विषयांचे Lab Manuals तसेच शैक्षणिक साधन सामग्री (Learning Material) मराठी- इंग्रजी (द्विभाषिक) भाषेमध्ये विकसित केलेली आहे. सदर विषयांची शैक्षणिक साधन सामग्री विद्यार्थी व संबंधित अधिव्याख्यातांकरिता मंडळाच्या संकेत स्थळावर **https://econtent.msbte.edu.in/econtent/marathi_econtent.php?scheme=K** आणि Lab Manuals **https://curriculum.msbte.edu.in/msbteacmon/curdev/outer.php?q=get_lab_manuals** या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

प्रथम व तृतीय सत्रातील विषयांच्या मराठी- इंग्रजी (व्दिभाषिक) भाषेमधील शैक्षणिक साधन सामग्रीच्या उपलब्धते बाबत आपल्या संस्थेतील संबंधित विभागप्रमुख, अधिव्याख्याता व विद्यार्थ्यांना अवगत करुन विद्यार्थ्यांसाठी मराठी- इंग्रजी (द्विभाषिक) भाषेमध्ये अध्यापनाची प्रक्रिया राबविण्याबाबतची कार्यवाही प्रभाविपणे करण्यात यावी. मंडळाव्दारे विकसित केलेल्या द्विभाषिक शैक्षणिक साधन सामग्री व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार इतर विषयांची मराठी- इंग्रजी (द्विभाषिक) साधन सामग्री संस्थास्तरावर तयार करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(उमेश टे. नागदेवे)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत माहितीकरिता:

मा. संचालक, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत माहिती व उचित कार्यवाहीकरीता:

उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर.